नवीन जी. एन. एम. अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत...
जितो एज्युकेशनल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट संचलित श्रीमती विमलादेवी ख्यालीलाल वघरेछा कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशन, साकेत रोड, माजीवाडा, ठाणे.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर २०२२/प्र.क्र.३२६/२२/शिक्षण १
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय मुंबई ४०० ००१.
दिनांक: ०३ नोव्हेंबर, २०२२.

वाचा : १ महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, यांचे पत्र क्र. मराशुवपशिम/जी.एन.एम./न.प्र./७७३/३९८५/२०२२, दि.१८.०८.२०२२.

२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र. एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१,दि. १३.०७.२०१८.

३ संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.डीएमईआर ११०१४/१५०/२०२२-सीईटीआयटी, दि.०६.१०.२०२२

**प्रस्तावना:**

जितो एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्ट संचलित श्रीमती विमलादेवी ख्यालीलाल वघरेछा कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशन, साकेत रोड, माजीवाडा, ठाणे या संस्थेचा नवीन जी.एन.एम अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. (१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी सदर प्रस्तावाची बृहद आराखड्यानुसार शिफारस केली होती.

२. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था नवीन जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त सदर शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, जितो एज्युकेशनल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट संचलित श्रीमती विमलादेवी ख्यालीलाल वघरेछा कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशन, साकेत रोड, माजीवाडा, ठाणे या संस्थेस सन २०२२-२३ साठी ६० (साठ) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन

Principal
Smt. Vimaladevi Khyalilal Vagharecha
College of Nursing Education
Balkum, Thane - 400608

Scanned with OKEN Scanner

जी.एन.एम. अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपध्दती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ व राज्य शासन यांनी ए.एन.एम./जी.एन.एम. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटीची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट, १९८८ चा क्र.६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम/ अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे

६) संस्था, त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय / दंत / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी ए.एन.एम./जी.एन.एम. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची/मंडळाची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती /अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी बृहद् आराखड्यानुसार केलेली शिफारस व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाच्या आधारे देण्यात येत आहे.

१०) संस्थेने जी.एन.एम. महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

Principal
Smt. Vimaladevi Khyalilal Vagharecha
College of Nursing Education
Balkum, Thane - 400 608.

Scanned with OKEN Scanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २००२ नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. प्री. पु. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१ मा राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

१ मा मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

२ मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

३ मा मंत्री (वै शि) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई

४ सचिव, भारतीय परिचर्या परिषद, ८ वा मजला, एनबीसीसी सेंटर, प्लॉट नं २, कम्युनिटी सेंटर, ओखला फेज १, नवी दिल्ली ११० ०२०

५ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई

६ सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ व ९ वा मजला, न्यू एक्सेलसियर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

७ सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

८ संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

९ प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई

१० प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई

११ अध्यक्ष सचिव, जितो एज्युकेशनल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, सर्व्हे नं ३५/१, ३५५ व ४२३ [illegible] रोड, माजीवाडा, ठाणे

१२ निवडनस्ती (शिक्षण-१)

Principal
Smt. Vimaladevi Khyalilal Vagharecha
College of Nursing Education
Balkum, Thane - 400 608.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner